# बेबी कॉर्न आणि स्वीट कॉर्न ( मधू मका ) सुधारित लागवड पद्धत

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

इथेनॉल व पशुखाद्य उद्योगाकडून तसेच प्रक्रिया युक्त पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात वापर होत असल्यामुळे पिवळ्या किंवा नारंगी रंगाच्या मक्याची लागवड मागील काही वर्षापासून आपल्या राज्यात वाढत आहे त्यासोबत बेबी कॉर्न,मधुमका (स्वीट कॉर्न) ची स्थानिक तसेच निर्यातीसाठी मागणी वाढत असल्यामुळे या अल्प कालावधीच्या ,जास्त नफा देणाऱ्या, हिरवा व उच्च दर्जाचे चारा पिक आणि शेतकऱ्यांचे आवडीचे पिक फेरपालटीचे पिक असल्याने या पिका खालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे.

बेबी कॉर्न हे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असलेले एक "सुपरफुड" आहे यामध्ये कार्बोहायड्रेट, कॅल्शियम, प्रोटीन, व्हिटॅमिन्स, मिनरल्स, अँटिऑक्सिडेंट आणि फायबर मोठ्या प्रमाणात असतात.याची चव खूप छान आहेच पण त्यासोबत यामध्ये मोठ्या प्रमाणात पोषणमूल्य आहेत. बेबी कॉर्न हे सॅलड म्हणून कच्चे खाता येते किंवा कॉर्न मंचुरियन,चिली पकोडे, कॉर्न मसाला असे वेगवेगळे पदार्थ यापासून बनवले जातात. स्वीट कॉर्न मक्याचे कणीस खायला चविष्ट असते तसेच आरोग्यासाठी ही फायदेशीर आहे. स्वीट कॉर्न मध्ये विटामिन "अ", "ब" ई. खनिजे आणि अँटिऑक्सिडंट यासारखी पोषक तत्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. स्वीट कॉर्न मुळे अन्नपचन होण्यास मदत होते, तसेच रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत होते.मक्याची पोळी खाण्याने कोलेस्ट्रॉल कमी होते आणि त्यामुळे कारडिओव्हॅस्क्युलरचा धोका कमी होतो. मकेच्या पिठात बिटा कॅरोटीन नावाचा तत्व आढळते, हे तत्व रक्तातील लाल पेशी निर्मितीत मदत करते त्यामुळे मक्याचे सेवन केल्यास अनिमियाचा त्रास होत नाही.

बेबी कॉर्न आणि स्वीट कॉर्नची लागवड मोठ्या शहरा लगतच्या परिसरामध्ये मागील पाच ते दहा वर्षापासून होत आहे. बेबीकॉर्न ची लागवड सांगली, कोल्हापूर,सातारा व पुणे परिसरामध्ये केली जाते तर स्वीट कॉर्न ची लागवड पुणे, सांगली, सातारा, नाशिक, छ.संभाजीनगर इत्यादी शहरालगतचे शेतकरी करत आहेत. बेबीकॉर्न चा उपयोग पंचतारांकित हॉटेलमध्ये सॅलड साठी व निर्यातीसाठी होतो, तर स्वीट कॉर्न चा उपयोग पर्यटन स्थळावर कणसे भाजून खाण्यासाठी तसेच प्रक्रिया उद्योगात मोठ्या प्रमाणात होत आहे. या पिकाच्या वाढत्या स्थानिक तसेच निर्याती साठी निर्माण असलेल्या संधीचा फायदा घेण्यासाठी सद्या शेतकऱ्यांमध्ये ही पिके चांगलीच प्रचलित होत आहेत. मागील काही वर्षांमध्ये पुणे आणि नाशिक शहराच्या लगतच्या क्षेत्रामध्ये स्वीट कॉर्न प्रक्रिया उद्योगाची स्थापना मोठ्या संख्येने झालेली असून स्वीट कॉर्नची मागणी व निर्यात मोठ्या प्रमाणात होत आहे.



बेबी कॉर्नचे पीक 55 ते 60 दिवसात तयार होते तर स्वीट कॉर्न हे 75 ते 80 दिवसात तयार होते. वर नमूद केलेल्या जिल्ह्यात शेतकरी दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात करत असून या कमी कालावधीच्या पिकांमधून जनावरासाठी हिरवा चारा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे शेतकऱ्यांचा या पिकाकडे कल वाढत चाललेला आहे. स्वीट कॉर्न व बेबीकॉर्न ही पिके अत्यंत कमी कालावधी असून त्यामधून नगदी उत्पादन मिळते तसेच चाऱ्यापासून अतिरिक्त उत्पादन मिळत असल्यामुळे मोठ्या शहरालगतच्या गावामधून लागवडीच्या क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत आहे.बेबी कॉर्न आणि स्वीट कॉर्न हे कच्चे किंवा भाजून ताज्या स्वरूपात सेवन केले जात असल्यामुळे या पिकाचे रसायनमुक्त ( Residue Free) उत्पादनास अनन्यसाधारण महत्त्व आहे त्यामुळे आज आपण या पिकाचे रसायन अंशमुक्त शेती कशी करता येईल याबाबत **" ज्ञानाच्या शेती "** माध्यमातून चर्चा करणार आहोत.

## जमिनीची निवड व लागवडीपूर्वीची पूर्वतयारी

मका या पिकासाठी चांगल्या निचऱ्याच्या जमिनीची आवश्यकता असते. मध्यम ते भारी, काळी, खोल, कसदार जमिनीमध्ये या पिकाचे उच्च उत्पादन मिळते. जमिनीचा सामू 5.5 ते 7 एवढा असावा. हलक्या जमिनीमध्ये सुद्धा मक्याची लागवड करता येते परंतु अशा जमिनीत भर खताचा वापर वाढवणे आवश्यक आहे.

लागवडीपूर्वी जमिनीची उभी आडवी नांगरट करून कुळवाच्या दोन-तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करून घ्यावी. पूर्वीचे पिक निघाल्यानंतर वापश्यावर जमिनीची मशागत करावी व जमीन तापू द्यावी म्हणजे जमिनीला काही काळ विश्रांती द्यावी. शेवटच्या पाळीच्या अगोदर एकरी 5 टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीमध्ये मिसळून घ्यावे व नत्र, स्फुरद आणि पालाश खताचा बेसल डोस जमिनीमध्ये मिसळून घ्यावा. त्यासाठी युरिया एक बॅग व सिंगल सुपर फॉस्फेट तीन बॅग शेवटच्या पाळीच्या अगोदर जमिनीवर एकसारखे प्रमाणात पसरवून पाळी टाकून रान बांधणी करावी.



## लागवडीचा हंगाम

नोव्हेंबर - डिसेंबर अति थंडीचे व एप्रिल - मे मधील जास्त तापमानाचा कालावधी सोडल्यास वर्षभर या पिकाची लागवड करता येते. अति थंडी किंवा जास्त तापमानामध्ये मका पिकाचे परागीभवन होण्यास अडचणी येतात त्यामुळे या कालावधीमध्ये मका पिक फुलोऱ्यावर येणार नाही याचा विचार करावा. स्वीट कॉर्न

ची लागवड करताना मार्च ते मे महिन्यात पीक कापणीस येणार नाही याची दक्षता घ्यावी यावेळेस बाजार भाव अत्यंत कमी असतात.

खरीप हंगाम : पावसाळी हंगामातील लागवड जून - जुलै

रब्बी हंगाम : हिवाळी हंगामातील लागवड सप्टेंबर - ऑक्टोबर व

उन्हाळी हंगाम : लागवड जानेवारी - फेब्रुवारी च्या दुसरा आठवडा पर्यंत करता येते.

**सुधारित वाण**

बेबी कॉर्न व स्वीट कॉर्न चे संकरित वाण विविध बियाणे उत्पादक कंपनीकडून बाजारात उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. शेतकऱ्यांनी आपण घेत असलेल्या वाणाचा वापर कशासाठी म्हणजेच ताजे स्वरूपातील वापर किंवा प्रक्रियेसाठी करण्यात येणार आहे याचा विचार करून वाणाची निवड करावी.

स्वीट कॉर्न चा वापर जर प्रक्रियेसाठी करणार असेल तर निवडलेल्या वाणाचे ब्रिक्स कमी असावेत व ताज्या स्वरूपात सेवन करायचे असल्यास त्याचे ब्रिक्स जास्त असणे आवश्यक आहे.बियाण्याची खरेदी ही अधिकृत विक्रेत्याकडून पक्क्या पावतीसह करावी. शेतकऱ्यांनी विकत घेत असलेल्या वाणाचे गुणधर्म बियाणे उत्पादक, विक्रेते, विक्री प्रतिनिधी तथा उत्पादकाच्या वेबसाईटवरून माहीती करून घ्यावेत तसेच लागवडी साठी निवडलेल्या वाणाबाबत इतर शेतकऱ्याकाढून माहिती घ्यावी. बेबी कॉर्न ची बहुतेक शेती ही करार पद्धतीने केली जाते.त्यामध्ये विविध प्रक्रिया उद्योग / कंपन्या बियाणे पुरवठा करतात व एक निश्चित दरात आलेले उत्पादन घेण्याची हमी देतात याबाबत शेतकऱ्यांनी जागरूक राहून नामांकित कंपनी सोबतच करार करावेत.

खाली काही प्रचलित वाणाची माहिती सुलभ संदर्भासाठी देण्यात आलेले आहे.

**बेबी कॉर्न :**

1) जी - 5414 (सिंजेंटा) :
2) जी - 5417 ( सिंजेंटा )
3) बायो- 9681 ( बियोसीड्स)

**स्वीट कॉर्न**

1) शुगर -75 ( सिंजेंटा )
2) टँक -75 ( सिंजेंटा )
3) हायब्रिक्स ( ऍडव्हान्टा )
4) ग्लोरी ( ऍडव्हान्टा )
5) स्वीट ग्लोरी ( इंडस )
6) मिठास ( नॉनगाऊ)

**बियाणाचे प्रमाण, लागवडीचे अंतर व पेरणी**

बेबी कॉर्न व स्वीट कॉर्न ची लागवड करत असताना दरवर्षी नवीन बियाणे विकत घ्यावे लागते कारण हे बियाणे संकरित असते. बियाण्याची एकरी गरज ही लागवडीच्या अंतरानुवर अवलंबून असते. सरासरी एकरी 2.5 - 3 किलो बियाणे आवश्यक असते. लागवड सऱ्या पाडून किंवा बेडवर करण्यात येते.1.5 - 2 फुटाच्या सऱ्या पाडून सरीच्या बगलेमध्ये एक तृतीयांश भागात उंचीवर बियाण्याची टोकन केले जाते किंवा बेडवर लागवड करायची असल्यास जोड ओळ पद्धत वापरून पेरणी करण्यात येते. पेरणीसाठी हस्तचलित पेरणी यंत्राचा वापर करावा जेणेकरून दोन रोपातील व दोन ओळीतील अंतर एकसारखे राखले जाते.

ज्ञानाची व आरोग्यदायी..!

दोन ओळीतील अंतर 75 ते 100 सेमी आणि दोन रोपातील अंतर 15 ते 30 सेमी ठेवावे यामुळे एकरी 25 ते 28 हजार रोपे बसू शकतात.

**बीज प्रक्रिया :**

बियाणे उत्पादकांनी बियाण्यास इमिडाक्लोप्रीड 70 % WS ची प्रक्रिया केलेली असते, पेरणीच्या दिवशी बियाण्यास अ‍ॅझोटोबॅक्टर, ट्रायकोडर्मा, स्फुरद विरघळणारे जिवाणू (पीएसबी) व पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू ( केएमबी ) प्रति किलो बियाण्यास 5 मिलि / ग्रॅम, थोड्याश्या गुळाच्या पाण्यासोबत घेवून बिजप्रक्रिया करून बियाणे सावलीत सुकवावे व लगेच पेरणी करावी.

**एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन**

शेवटच्या पाळीच्या पूर्वी 5 टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीवर एकसमान पसरवून देऊन मातीत मिसळून घ्यावे तसेच नत्रासाठी 1 बॅग युरिया व सिंगल सुपर फॉस्फेट च्या 2-3 बॅग जमिनीवर पसरून मातीत मिसळून घ्याव्यात ज्यामुळे या खताची उपलब्धता पीक वाढीच्या अवस्थेनुसार होत राहील.

कृषी विद्यापीठांनी 60 किलो नत्र, 25 किलो स्फुरद व पालाश प्रती एकर याप्रमाणे रासायनिक खताची शिफारस मका या पिकासाठी केलेली आहे. या पिकासाठी नत्राचा 50 टक्के भाग हा पीक 20 ते 25 दिवसाचे असताना करावा. मका हे पिक खादाड असल्यामुळे या पिकास कॅल्शियम, मॅग्नेशियम व गंधक या दुय्यम अन्न द्रव्याचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होते. एकात्मिक अन्नद्रव्याचा संतुलित पुरवठा होण्यासाठी ग्रेड II सूक्ष्ममुलद्रव्य एकरी 10 किलो पेरणीपुर्वी द्यावे किंवा एकरी 10 किलो मॅग्नेशियम सल्फेट व झिंक सल्फेट प्रत्येकी पेरणीच्या वेळेस वापरल्यास उत्पादनात वाढ होते.



**तण नियंत्रण व आंतर मशागत**

पिक वाढीच्या सुरुवातीच्या 25 दिवसापर्यंत मका पिक तण मुक्त ठेवावे जेणेकरून मुख्य पिकाची तणासोबत जागा ,अन्नद्रव्य,पाणी आणि सूर्यप्रकाशासाठी स्पर्धा होत नाही. त्यासाठी उगवण पूर्व तणनाशक अ‍ॅट्राझीन 500- 1000 ग्रॅम पेरणी केलेल्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी (48 तासाच्या आत) फवारणी करावी.

उगवण पश्चात तण नाशकामध्ये टेम्बोट्रिन तणनाशक तणे 2-5 पानावर असताना पीक लागवडीपासून 20-25 दिवसांनी एकरी 115 मिली या प्रमाणात घेऊन फवारावे परंतु त्यासाठी स्वच्छ सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते तसेच तण थोडे जास्त मोठे असले तरी याचे परिणाम चांगले मिळतात.

टोप्रोमोझोन चा वापर तणाची वाढ कमी असल्यास व पुरेसा सूर्यप्रकाश नसल्यास करावा. हे तण नाशक मुळांद्वारे व पानामधून शोषले जाते त्यामुळे तणाचे उत्कृष्ट पद्धतीने नियंत्रण होते.वरील दोन्ही तणनाशकासोबत अट्राझीन 500 ग्रॅम मिसळावे.

बेडवर मक्याची लागवड केली असल्यास पिकास भर देण्याची गरज नाही परंतु सरी मध्ये जर मका लागवड केली असल्यास सरी फोडून मक्याच्या ताटास मातीची भर देण्यात येते त्यावेळेस उर्वरित नत्राचा 50% हप्ता सरी फोडण्यापूर्वी द्यावा.स्वीट कॉर्न मकेस एका पेक्षा जास्त कणसे आली तर त्यातील सुरुवातीचे आलेले एक कणीस ठेऊन जास्तीची कणसे काढून टाकावित.

**पाणी व्यवस्थापन**

मका पिक हे बागायती असल्यामुळे या पिकास जमिनीच्या मगदूराप्रमाणे 5 ते 7 पाण्याच्या पाळ्या द्याव्या लागतात त्यासाठी सिंचनाची पुरेशी सुविधा असणे आवश्यक आहे. मध्यम जमिनीत दर 8 दिवसांनी तर भारी जिमनीत दर 10 दिवसांनी पाण्याची पाळी द्याव्यात.पाणी देताना 2.5 ते 4 सेमी पाणी प्रत्येक पाण्याच्या पाळीत द्यावे. पावसाचे किंवा सिंचनाचे पाणी पिकात साठणार नाही याची दक्षता घ्यावी, जमीन कायम वाफश्यावर राहील हे पहावे.

चिनी पद्धतीने लागवड करायची असल्यास दोन मक्याच्या ओळींमध्ये एक ठिबकची इनलाईन लॅटरल बसवून पाणी व्यवस्थापन करता येते,त्यासाठी 16/18 मिमी ची एक लॅटरल वापरावी व त्यावर दर एक फुटावर 2 लिटर डिस्चार्जे चे इनलाईन ड्रीपर असावेत. या पध्दतीने मक्याचे दोन ओळीतील अंतर 75 सेमी ठेवले जाते व दोन रोपातील अंतर 1 फूट ठेवावे.



**एकात्मिक किड व रोग नियंत्रण**

मका पिकावर खोडकिड, अमेरिकन लष्करी अळी, कणसे पोखरणारी अळी, मावा या किडींचा प्रार्दूभाव होतो तसेच यामध्ये खोडकूजव्या, पर्णकरपा या रोगांचा प्रार्दूभाव होतो. मका पिकाचे संकरित वाण हे वरील रोगास प्रतिकार / सहनशिल आहेत त्यामुळे या पिकास रोग फारसे त्रासदायक ठरत नाहीत परंतू किडीमध्ये मागील 8-10 वर्षात अमेरिकन लष्करी अळी ही एक शेतकऱ्यांची डोकेदूखी झालेली आहे.

एकात्मिक कीड रोग नियंत्रणासाठी मका पिकाचे सुरूवातीचे वाढीचे अवस्थेत पानावरील ठिपके, अळीवर्गीय किडी व रस शोषण करणाऱ्या किडीसाठी बिव्हेरीया बॅसिनिया, लेक्यानीसिलीअम लेक्यानि, बॅसिलस सबटिलिस, मेटारायझम ॲनीसोप्ली, नोमुरिया रिलाई या जैविक बुरशीनाशकांची 5 ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. तसेच एकात्मिक किड व रोग नियंत्रणासाठी खालील उपाययोजना कराव्यात.

- उन्हाळ्यात शेताची खोल नांगरट करून जमीन तापू द्यावी.
- रुंद वरंबा सरी (बेड) वर लागवड करावी.
- रासायनिक तसेच जैविक बिजप्रक्रिया करावी.
- वेळेवर पेरणी करावी,
- पिकाची फेरपालट करावी.
- प्रति एकर 20 ते 40 चिकट सापळ्यांचा रस शोषण करणाऱ्या किडींसाठी वापर करावा.
- किड नियंत्रणासाठी प्रथम जैविक बुरशीनाशकांचा व वनस्पतीजन्य किडनाशकांचा वापर करावा.
- प्रति एकर 8 ते 10 पक्षी थांबे लावावेत.
- एकरी एक प्रकाश सापळा लावावा.
- नत्र युक्त खताचा अतिरिक्त वापर करू नये.
- ठिबक सिंचन या सुधारित पध्दतीचा सिंचनासाठी वापर करावा.
  पाणी व्यवस्थापन योग्य रीतीने करावे. पिकात पावसाचे अथवा सिंचनाचे पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- लागवडीचे अंतर, जमिनीचा प्रकार, लागवडीचा हंगाम, वाण यांचा विचार करून एकरी झाडांची संख्या योग्य राखावी. कमी अंतरावर लागवड टाळावी.
- प्रत्येक रोपास पुरेसा सूर्यप्रकाश व खेळती हवा राहील याप्रमाणे लागवड करावी.

शेतकऱ्यांनी या किडींचा जिवणक्रम, किड / रोग वाढण्यासाठी अनुकूल हवामान, पिकांवर हवामान बदलांमुळे येणारे अजैविक ताण, चूकीचे पाणी व्यवस्थापन, असंतुलीत रासायनिक खत व्यवस्थापन व किडीमुळे येणारे जैविक ताण याचा सखोल अभ्यास करावा, शास्त्रीय माहिती मिळवावी. पिकांची नियमित पाहणी करून निरिक्षणे घ्यावीत व सुरूवातीचे टप्प्यात जैविक किडनाशकांचा वापर करावा. जैविक किडनाशकांचा वापर केल्यावर व पिकांवर अजैविक / जैविक तणांचे व्यवस्थापन केल्यावर किड व रोगांचा प्रार्दूभाव फारसा होत नाही.

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जैविक किड / रोग नाशकाचा वापर पुढील प्रमाणे करावा. रस शोषण करणाऱ्या किडीसाठी व सर्व प्रकारच्या अळ्यांसाठी लेक्यानिसिलियम लेक्यानी, बिव्हेरिया बॅसियाना, बॅसिलस थुरेंजिनिसिस, लॅक्टोबॅसिलस, नोमुरिया रिलाई व बॅसिलस सबटिलीस प्रत्येकी 5 ग्रॅम प्रति लिटर पाण्यात घेऊन पिकावर लागवडी नंतर 10/15 दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. ज्यामुळे रस शोषण करणाऱ्या किडीचे व अळ्यांचे नियंत्रण होते. सूक्ष्मजीव फवारणी करताना त्यासोबत रासायनिक बुरशीनाशकांचा वापर करू नये. या फवारण्या सायंकाळी कराव्यात.

किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास सोबतचे तक्त्यामध्ये नमूद केलेले किटकनाशक / बुरशीनाशकांचा शिफारशीप्रमाणे प्रमाण घेऊन सकाळी / सायंकाळी फवारण्या घ्याव्यात. किडनाशकांचा वापर हा दर वेळी वेगळ्या गटांचा करावा. एकच एक गटातील किडनाशके वापरू नयेत. बेबी कॉर्न / स्विट कॉर्न पिकासाठी केंद्रिय किटकनाशक मंडळ तथा नोंदणी समिती तसेच कृषी विद्यापिठांनी या पिकासाठी किड व रोग निहाय किडनाशकांच्या फारश्या शिफारशी नाहीत परंतू शेतकरी वापर असलेल्या किडनाशकांची माहिती सोबतच्या प्रपत्रात दिलेली आहे.

## काढणी व उत्पादन

बेबी कॉर्न च्या कणसाची काढणी ही 3-4 टप्प्यात करावी लागते. एका ताटास 3-4 कणसे लागतात त्याची काढणी टप्प्याटप्प्याने करावी लागते. त्यासाठी कणसावरील केसराची लांबी पहिल्या टप्प्यात तीन बोटापर्यंत म्हणजेच 3 ते 4 सेंटीमीटर सेमी असल्यास अशी कणसे काढावीत त्यानंतर एक ते दोन दिवसाचे अंतराने पुढील दोन किंवा तीन टप्प्यात कणसाची काढणी करावी व बाजारात विक्रीसाठी किंवा प्रक्रिया उद्योगास पाठवावीत.

स्वीट कॉर्नच्या एका ताटापासून एकच कणीस मिळते. कणसाची काढणी 80 टक्के दाणे भरल्यास करावी, याची काढणी एकाच टप्प्यात करता येते.

कणसाची काढणी झाल्यानंतर हिरवी ताटे विळ्याने कापून त्याचा मुरघास करावा किंवा चाऱ्याची विक्री करावी त्यामधून अतिरिक्त उत्पादन मिळते. बेबीकॉर्न चा चारा हा स्वीट कॉर्न पेक्षा जास्त सकस असतो. चाऱ्याचे उत्पनातून पिकाचा उत्पादन खर्च निघून जातो व कणसाचे उत्पादन निव्वळ उत्पन्न म्हणून शिल्लक राहते. सर्वसाधारणपणे 500 रुपये प्रति गुंठा याप्रमाणे चाऱ्याची विक्री होते.

पिक लागवडीचा हंगाम, हंगामातील वातावरण, जमिनीचा पोत, वाणाची निवड, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण आणि शेतकऱ्याचे एकंदरीत केलेले पिक व्यवस्थापन यावर उत्पादन अवलंबून असते. बेबीकॉर्न चे उत्पन्न एकरी 2.5 टन पर्यंत मिळते व त्यास सरासरी 10-12 रुपये प्रति किलो दर मिळतो. स्वीट कॉर्नचे एकरी उत्पादन 6- 8 टनापर्यंत मिळते. स्वीटकॉर्नचे दर हे अनिश्चित असतात. स्वीट कॉर्न च्या कणसास प्रति किलो 7 रुपये ते 18 रुपयापर्यंत दर मिळतो.

एकंदरच बेबीकॉर्न व स्वीट कॉर्न या पिकापासून 2-3 महिन्यांमध्ये शेतकऱ्यास एकरी 1 लाख रुपयांपर्यंत निव्वळ नफा मिळू शकतो परंतु त्यासाठी आवश्यक आहे ते म्हणजे पीक वाढीचे तंत्रज्ञान समजून घेऊन वेळेच्या वेळी सर्व बाबी पिकाच्या आवश्यकतेनुसार केल्यास पिक उत्पादन खर्चात बचत होऊन शेतकऱ्यासाठी शेती फायद्याची आणि ग्राहकासाठी आरोग्याची म्हणजेच " **ज्ञानाची शेती** " होईल.



## स्वीट कॉर्न व बेबी कॉर्न या पिकासाठी केंद्रिय किटकनाशक मंडळ आणि नोंदणीकृत समिती (CIBRC) व कृषी विद्यापेठ यांच्या फारश्या शिफारशी नाहीत परंतू शेतकरी धान्यासाठी मका या पिकाच्या खाली नमूद केलेली किडनाशके / बुरशीनाशकांचा वापर करतात.

| अ.क्र. | किड/रोगांचे नाव | किडनाशकाचे नाव क्रियाशील घटकाचे प्रमाण व गट | उत्पादकांचे नाव व ब्रँड नेम | एकरी प्रमाण | PHI |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमेरिकन लष्करी अळी | ब्रोफ्लॉमिलिड 300 G/L SC | बीएएसएफ - इक्सपोनस | 50 | 29 |
| 2 | अमेरिकन लष्करी अळी | इमामेक्टीन बेंझोऐट 1.5% + प्रोफेनोफॉस 35% W/W WDG | सुमिटोमो - कोरको<br>टाटा - मिराया | 400 | - |
| 3 | अमेरिकन लष्करी अळी व खोडकिडा | आयसोसायक्लोसिरम 9.2%<br>किंवा आयसोसायक्लोसिरम 10% W/W DC आयसोसायक्लोसिरम 18.1% SC | सिंजेंटा - सिमोडीस<br>सिंजेंटा - इनसिपीओ | 120<br>100-200 | 48 |
| 4 | अमेरिकन फॉल आर्मी वॉर्म | स्पिनोटोरम - 11.70% SC | डाऊ - डेलेगेट | 100 | 32 |
| 5 | मावा, खोडमाशी, खोड किडा | थायोमिथोक्झाम 12.60% + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन 9.50% ZC | सिंजेंटा - अलिका | 50 | 42 |
| 6 | खोडमाशी, मावा | थायोमिथॉक्झाम 25% WG | सिंजेंटा - ॲक्टरा | 100 | - |
| 7 | अमेरिकन लष्करी अळी | क्लोरँट्रनिलीप्रोल 18.5% SC | एफएमसी - कोरोजन | 60 | 22 |
| 8 | अमेरिकन लष्करी अळी | इमामेक्टीन बेंझोएट 5% SG | क्रिस्टल - प्रोक्लेम | 80 | - |
| 9 | अमेरिकन लष्करी अळी | इमामेक्टीन बेंझोएट 5% SG + ल्यूफेनुरॉन 40% WG | सिंजेंटा - इव्हिसिंट | 32 | - |
| 10 | अमेरिकन लष्करी अळी | नोव्हालुरॉन 5.25% + इमामेक्टीन बेंझोएट 0.9% SC | युपीएल - गुन्थर<br>अदामा - बाराझाईड | 300 | - |
| 11 | तांबेरा, करपा | क्रिसोक्झीम मिथाईल 44.3% | टाटा रॅलिज - इरगॉन | 200 | - |
| 12 | पानावरील करपा, केवडा | मॅन्कोझेब 75% WP | धानुका - एम 45 | 400-500 | - |
| 13 | पानावरील करपा | झायनेब 75% WP | इंडोफिल Z-78 | 200-250 | - |